# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक २२७ वा रविवार दि.११ फेब्रुवारी २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




# शिर्डीसाठी काँग्रेस आग्रही : आमदार बाळासाहेब थोरात

नगर : पुढारी वृत्तसेवा : कोणत्या मतदारसंघात कोण निवडून येऊ शकतो, त्यावर लोकसभेचे जागावाटप करण्यात येते. आम्हाला विजयाची खात्री असल्याने आम्ही शिर्डीच्या जागेसाठी आग्रही आहोत. आमच्याकडे सक्षम उमेदवार आहे. मात्र त्याबाबतचा निर्णय चर्चे अंती होईल, असे विधिमंडळातील काँग्रेसचे गटनेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी आज स्पष्ट केले. राज्यातील सध्याच्या राजकीय स्थितीबाबत आमदार थोरात यांनी आज पत्रकार परिषदेत विस्तृत भूमिका मांडली. ॲड. प्रकाश आंबेडकर महाविकास आघाडीत सहभागी झाले असले, तरी त्यांनी मांडलेल्या किमान समान कार्यक्रमावर एकत्र येऊन चर्चा करू आणि मग जनतेला आश्वासित करू, असेही त्यांनी स्पष्ट केले.राज्य अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे, असे सांगून सरकारवर टीका करताना आमदार थोरात म्हणाले, की कांद्याची निर्यातबंदी केल्याने भाव मिळत नाही. कापूस, सोयाबीनचेही दर पडले आहेत. शेतकर्यांसाठी प्रचंड अडचणीचा काळ आहे. टँकरची संख्या वाढत आहे. कायद्याचा धाक राहिला नाही. तीन महत्त्वाकांक्षी लोकांनी एकत्र येऊन सरकार निर्माण केले. त्यांच्यात मुख्यमंत्री होण्यासाठी स्पर्धा लागली आहे. त्यांचा मेळ घालण्यातच वेळ जात आहे. राज्यकर्तेच गुन्हेगार होतात, त्यामुळे राज्यात अत्यंत धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.माजी आमदार विनोद घोसाळकर यांचा मुलगा अभिषेक याच्यावर अत्यंत थंड डोक्याने गोळ्या झाडण्यात आल्या. सत्ताधारी भाजपचे आमदार पोलिस ठाण्यात आपल्याच सहकारी पक्षाच्या पदाधिकार्यांवर गोळ्या झाडतो. त्यामुळे राज्यात कायद्याचा धाक राहिला नाही. कायदा व सुव्यवस्था बिघडली आहे. मुख्यमंत्र्यासोबत गुन्हेगारांचे फोटो व्हायरल होतात. राज्यकर्तेच गुन्हेगार होतात, त्यामुळे राज्यात अत्यंत



धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी आता जनतेने आवाज उठविणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा आमदार थोरात यांनी व्यक्त केली. स्वायत्त संस्था सत्ताधार्यांच्या गुलाम झाल्या आहेत. त्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. चंडीगड हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आता जनतेला निर्णय घ्यावा लागेल. न्यायालयात निर्णय मिळत नाही आता जनतेच्या न्यायालयात न्याय मिळवू, असेही ते म्हणाले.

## चौधरी चरणसिंह यांचा अपमान खपवून घेणार नाही : राज्यसभा सभापतींनी खर्गेंना सुनावले

नवी दिल्ली, पुढारी वृत्तसेवा : देशाचे माजी पंतप्रधान चौधरी चरणसिंह यांना शुक्रवारी भारतरत्न घोषित करण्यात आला. यानंतर शनिवारी (दि. १०) राज्यसभेत राष्ट्रीय लोक दलाचे प्रमुख आणि चौधरी चरण सिंह यांचे नातू जयंत चौधरी बोलायला उभे राहिले. नेमक्या याच वेळी काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी आक्षेप घेत चौधरी यांना कोणत्या नियमानुसार बोलण्याची परवानगी दिली, असा प्रश्न यांनी विचारला आणि यावर राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी खर्गे यांना चांगलेच सुनावले.देशाचे माजी पंतप्रधान आणि जयंत चौधरी यांचे आजोबा चौधरी चरणसिंह यांचा सन्मान केल्याबद्दल सरकारचे आभार मानण्यासाठी जयंत चौधरी उभे राहिले. त्यावर काँग्रेसने आक्षेप घेतला आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी राष्ट्रीय लोक दलाचे नेते जयंत चौधरी यांना कोणत्या नियमानुसार बोलण्याची परवानगी दिली असा सवाल उपस्थित केला. त्यावर तुम्ही चौधरी चरणसिंह यांचा अपमान केला, त्यांच्या वारशाचा अपमान केला. तुमच्याकडे चौधरी चरणसिंहांसाठी वेळ नव्हता. त्यांच्या मुद्द्यावरून सभागृहात असे वातावरण निर्माण करून तुम्ही देशातील प्रत्येक शेतकऱ्याला दुखावत आहात. अशा शब्दात सभापती जगदीप धनखड यांनी मल्लिकार्जुन खर्गे यांना सुनावले.या दरम्यान मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, नेत्यांना भारतरत्न देऊन सन्मानित करण्यावर आम्हाला वाद करायचा नाही. भारतरत्न घोषित झालेल्या सर्वांना सलाम करतो. मात्र जयंत चौधरी यांना मुद्दा मांडायचा असेल तर ते कोणत्या नियमानुसार बोलत आहेत, कोणत्या नियमानुसार त्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आली, हे जाणून घ्यायचे आहे. आम्हालाही बोलण्याची परवानगी देण्यात यावी, अशी आग्रही टिप्पणी केली. एकीकडे तुम्ही नियमांबद्दल बोलत आहात आणि नियमांचे पालन होत नाही, हे बरोबर नाही, असे खर्गे म्हणाले. आणि त्यामुळे सभापती जगदीप धनखड आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात खडाजंगी झाली आणि सभागृहात काही काळ गदारोळ झाला.

# राम मंदिराच्या उभारणीला धर्माशी जोडू नका



नवी दिल्ली : राम हे भारताचे प्राण आहेत, २२ जानेवारी हा ५०० वर्षांच्या संघर्षाच्या समाप्तीचा दिवस आहे. हा दिवस कोट्यवधी भक्तांच्या आशा, आकांक्षा आणि सिद्धीचा दिवस आहे असे गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले. अयोध्येतील राममंदिराचे ऐतिहासिक बांधकाम आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावरील चर्चेवर आज ते लोकसभेत बोलत होते.२२ जानेवारी हा संघर्ष आणि १५२८ मध्ये सुरू झालेल्या चळवळीचा शेवट आहे. १५२८ मध्ये सुरू झालेला न्यायाचा लढा याच दिवशी संपला. ५०० वर्षानंतर अन्यायाविरोधाची लढाई आता संपली. २२ जानेवारी हा दिवस हजारो वर्षांपासून ऐतिहासिक बनला आहे. ज्यांना इतिहास आणि ऐतिहासिक क्षण ओळखता येत नाहीत ते आपले अस्तित्व गमावून बसतात, अशा शब्दांत अमित शहा यांना विरोधी पक्षावर हल्लाबोल केला. २२ जानेवारी ही महान भारताची सुरुवात होती. जे लोक भगवान राम नसलेल्या देशाची कल्पना करतात त्यांना आपला देश नीट माहित नाही. ते लोक वसाहतवादांच्या दिवसांचे प्रतिनिधित्व करतात, असा आरोपही अमित शहा यांनी राम मंदिर प्रतिष्ठापनेला विरोधी करणा-या पक्षांवर केला.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पुढे म्हणाले, आज मला माझ्या भावना आणि देशातील जनतेचा आवाज या सभागृहासमोर मांडायचा आहे. जी न्यायालयीन कागदपत्रांमध्ये वर्षानुवर्षे दफन झाली होती. मोदीजी पंतप्रधान झाल्यानंतर त्याला आवाज आणि अभिव्यक्तीही मिळाली. देशाला भक्ती आंदोलनाची परंपरा आहे. राम व्यक्ती नाही, प्रतिक आहे. भारतीय संस्कृती आणि रामायण वेगळे पाहिले जाऊ शकत नाही. अनेक भाषांमध्ये, अनेक प्रांतांमध्ये आणि अनेक धर्मांमध्ये रामायणाचा उल्लेख केला आहे, रामायण अनुवादित केले आहे आणि रामायणाच्या परंपरांवर आधारित आहे. सुप्रीम कोर्टाच्या निकालावर टीका करणे चुकीचे आहे, असे म्हणत राम मंदिर उभारणीची कोणत्या धर्मासोबत तुलना करू नये, असा सल्लादेखील शहा यांनी यावेळी विरोधकांना दिला.पीएम मोदींवर आम्हाला गर्व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणतात राम मंदिर आंदोलनाकडे दुर्लक्ष करून या देशाचा इतिहास कोणीही वाचू शकत नाही. १५२८ पासून प्रत्येक पिढीने हे आंदोलन कोणत्या ना कोणत्या स्वरूपात पाहिले आहे. हे प्रकरण बरेच दिवस अडकून राहिले. मोदी सरकारच्या काळात स्वप्न पूर्ण झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आमचे नेते आहेत, याचा आम्हाला गर्व आहे, असेही अमित शहा म्हणाले.

# काँग्रेसला सोडचिट्ठी दिलेले बाबा सिद्दिकी यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश



मुंबई-लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसला सोडचिट्टी दिलेले माजी मंत्री, काँग्रेस नेते बाबा सिद्दिकी यांनी आज (दि.१०) अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेसला रामराम केला आहे. मूळचे बिहारमधील असलेल्या व मुंबईमध्ये राजकीय कारकिर्द सुरु झालेल्या बाबा सिद्दीकी यांना लोक बाबा झियाउद्दीन सिद्दीकी या नावानेही ओळखतात. मात्र, ते बाबा सिद्दीकी या नावानेच अधिक लोकप्रिय आहेत. मुंबई काँग्रेसमधील ते महत्त्वपूर्ण राजकीय व्यक्तीमत्व मानले जात होते. १९७७ मध्ये किशोरवयीन जीवनात काँग्रेस पक्षात प्रवेश केला. नंतर ते भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघचा (छङ्गणख) भाग बनून वेगवेगळ्या चळवळींमध्ये सहभागी होत राहिले. बाबा सिद्दीकी यांनी मुंबईच्या एमएमके कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यानंतर बाबा दोनवेळा नगरसेवकही राहिले आहेत. यानंतर बाबा सिद्दीकी तीन वेळा वांद्रा येथून काँग्रेस पक्षाकडून महाराष्ट्र विधानसभेत आमदार झाले. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांच्याकडून बाबा सिद्दीकी यांचा पराभव झाला होता.


४८ वर्षांचा महत्त्वाचा प्रवास माजी मंत्री, काँग्रेस नेते बाबा सिद्दीकी यांनी गुरुवारी (दि.८) काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला. बाबा सिद्दीकी यांनी त्यांच्या 'द' अंकाउंटवर पोस्ट करत म्हटले होते की, मी तरुणपणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सामील झालो. हा ४८ वर्षांचा महत्त्वाचा प्रवास आहे. आज मी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. मला या प्रवासाबद्दल बोलायला खूप आवडले असते. पण ते म्हणतात ना काही गोष्टी न सांगितलेल्या बऱ्या. या प्रवासात सहभागी झालेल्या सर्वांचे मी आभार मानतो.माध्यमांशी शुक्रवारी (दि.९) बोलताना अजित पवार म्हणाले होते की, बाबा सिद्दिकी १० फेब्रुवारीला संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील आणि ११ फेब्रुवारीला आणखी काहीजण पक्ष प्रवेश करतील.

# आज रेणापूर येथे कुस्ती स्पर्धाचे भव्य दिव्य नियोजन ;आ. कराड यांच्या हस्ते विविध स्पर्धेचे बक्षीस वितरण











लातूर :- भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक २०२४ च्या माध्यमातून ११ फेब्रुवारी रविवार रोजी रेणापूर येथे नामांकित मल्लांच्या नमो केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित आल्या असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध क्रीडा स्पर्धेचे बक्षीस वितरण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. कुस्ती स्पर्धेचे मराठवाड्यात पहिल्यांदाच भव्य दिव्य नियोजन करण्यात आले आहे तेव्हा मतदार संघातील भाजपा लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्त्यांसह खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

नमो चषक २०२४ सर्वत्र मोठ्या प्रमाणात होत असून विविध स्पर्धेच्या माध्यमातून तरुणात उत्साहाचे आणि नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर आणि लातूर दोन तालुक्यात क्रिकेट, हॉलीबॉल, खो-खो, कबड्डी, कॅरम विविध क्रीडा स्पर्धांचे मोठ्या प्रमाणात झाल्या. अंतिम फायनल स्पर्धा विधानसभा मतदार संघाच्या होत आहेत. तर नामांकित मल्लांच्या कुस्ती स्पर्धा रेणापूर येथे रविवारी दुपारी आयोजित करण्यात आल्या असून या कुस्ती स्पर्धेचे नियोजन मराठवाड्यात प्रथमच भव्य आणि दिव्य स्वरूपात करण्यात आले आहे. भारदस्त आणि जबरदस्त कुस्ती स्पर्धा पाहण्याची संधी संयोजकाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या सर्व स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा ११ फेब्रुवारी २०२४ रविवार रोजी सायंकाळी ५ वाजता रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालय शेजारी मेन रोड येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे खासदार सुधाकर शृंगारे, भाजयूमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजयुमोचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

नमो केसरी कुस्ती स्पर्धा आणि विविध स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे बक्षीस वितरण कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात येत असून या सोहळ्यास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विशेषता रेणापूर शहरासह तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या विविध आघाडी मोर्चासह सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर खेळाडू आणि क्रीडा प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय....

# घड्याळाचे काटे उलटे !

घड्याळाचे काटे उलटे फिरवणारे जुनाट विचार मला मान्य नाहीत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे एकेकाळचे सर्वेसर्वा शरद पवार नेहमीच सांगत असतात; परंतु आता तुमचे विचार तुमच्यापाशी ठेवा, असे ठणकावून सांगत पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचे 'घड्याळ'च पळवले आहे! विधिमंडळ पक्षातील बहुमताच्या जोरावर त्यांचा गट हाच मूळ राष्ट्रवादी पक्ष असल्याचा निकाल निवडणूक आयोगाने दिल्यामुळे, अजित पवार यांना मान्यता मिळाली. या निर्णयाने 'मविआ'तील दोन्ही पक्षांना जबरदस्त धक्का बसला. पक्षाचे नाव आणि चिन्ह गेले तरी काही हरकत नाही, शरद पवार हाच आमचा ब्रँड आहे, असा युक्तिवाद केला जात असला, तरी तसे सांगण्यावाचून पवार गटासमोर आजघडीला पर्याय नाही.अदृश्य शक्तीने आजपर्यंत महाराष्ट्राच्या विरोधात जसे निर्णय घेतले, त्यातलाच हा निर्णय असल्याची टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे, तर आयोगाने दिलेल्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटले आहे. पवार गटासमोर तोच मार्ग दिसतो. पवारांना ठाकरे गटाच्या तुलनेत फार कमी वेळ मिळाला आहे; कारण निवडणुका तोंडावर आहेत. राजकारणात अत्यंत तरबेज मानल्या जाणार्या पवार यांच्या पुतण्याने धोबीपछाड करताना पक्ष, चिन्ह आणि कार्यकर्त्यांची फळीच हिसकावली.निवडणूक आयोगाने बहुमताचे तंत्र आणि तांत्रिक पुरावे लक्षात घेऊन दिलेला निकाल येथे महत्त्वाचा ठरला. राष्ट्रवादीच्या खासदार, आमदार आणि विधान परिषद सदस्यांची आकडेवारी तपासली असता, अजित पवार गटाकडे ५७, तर शरद पवार गटाकडे २८ जणांचे समर्थन असल्याचे आयोगास आढळले. हाही निर्णय मुख्यमंत्री शिंदे गटाच्या दाव्यानुसार पुढे जाणार हे स्पष्टच होते, ते घडले आहे. अर्थात, पक्षांतरबंदी कायद्याच्या मर्यादा पुन्हा एकदा स्पष्ट झाल्या आहेत. आज ना उद्या सर्वोच्च न्यायालयाला आणि कायदेमंडळाला त्याची नवी बंदिस्त चौकट काटेकोरपणे तयार करावी लागेल, असेही हा निकाल सांगतो. निकालाचे निघायचे ते राजकीय अर्थ निघत राहतील; मात्र पवारांचा राष्ट्रवादी पक्ष अधिकृतरीत्या दुभंगला! काँग्रेसमध्ये नेतृत्वाची संधी न मिळाल्याने सोनिया गांधी यांच्या विदेशीत्वाचा मुद्दा पुढे आणून बंड करणारे शरद पवार आपला पक्ष वीस वर्षेही सांभाळू शकले नाहीत, हे सत्य आहे. भाकरी फिरवण्याची भाषा करणार्या पवार आणि त्यांच्या पक्षात त्यांच्या पुतण्यानेच ती फिरवून दाखवली! शरद पवार हीच जर पक्षाची ओळख होती आणि त्यांनीच सर्व नेत्यांना घडवले हे खरे असेल, तर सत्तेच्या आमिषामुळे बहुतेकजणांनी त्यांची साथ का सोडली? पक्षातील संघटनात्मक बलाबल निवडणूक आयोगाने तपासले नाही, याचे कारण पक्षाच्या कार्यकारिणीच्या सदस्यांच्या निवडणुका न होता, त्यांची नावे केवळ 'घोषित' करण्यात आली होती. जर एखादा पक्ष लोकशाही पद्धतीने चालवला जात नसेल, तर पक्ष कोणाचा, हे ठरवण्याचा निकष पक्ष संघटनेत कोणाचे बहुमत आहे, हा होऊ शकत नाही, असे निवडणूक आयोगाने ठाकरे विरुद्ध शिंदे प्रकरणात म्हटले होते.दि. १० व ११ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय अधिवेशनात अध्यक्ष म्हणून शरद पवार यांची निवड करताना पक्ष घटनेचे उल्लंघन करण्यात आले होते. अधिवेशनात किती लोक उपस्थित होते आणि त्यांपैकी कितीजणांनी त्यांच्या निवडणुकीवर शिक्कामोर्तब केले, याचे कोणतेही रेकॉर्ड ठेवण्यात आले नव्हते. निवडणूक आयोग हे केंद्र सरकारचे प्यादे आहे, ही टीका समजा रास्त मानली, तरीही रोजच्या रोज लोकशाही, संविधान याबद्दलचे बोधामृत पाजणार्या पवारांनी आपल्या पक्षात तरी खरी लोकशाही पाळली का, असा प्रश्न उद्भवतो. आयोगाने पक्षातील एकाधिकारशाहीकडे लक्ष वेधले आहे. घराणेशाही असलेल्या अनेक पक्षांमध्ये पक्षांतर्गत निवडणुका न घेता मर्जीतल्या लोकांच्या नेमणुका करून, ते निवडून आल्याचे केवळ दाखवले जाते किंवा पक्षघटनेतील तरतुदींशी विसंगत पद्धतीने निवडणुका घेतल्या जातात, तेव्हा पक्षाचे रूपांतर एखाद्या खासगी कंपनीत होते, असे ताशेरे निवडणूक आयोगाने मारले आहेत.'आता नाव व चिन्ह गेले तरी कोणाला सांगताय, म्हातारा झालोय,' अशी भावनिक साद पवार गटाकडून घातली जात आहे. गटाचे नेते भावनिकतेपेक्षा वास्तवाला कधी भिडणार, पवार यांच्या नेतृत्वाच्या बळावर किती दिवस काढणार, असे प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाले आहेत, त्यांची उत्तरे वेळीच शोधलेली बरी! शरद पवार यांचे बव्हंशी बिनीचे शिलेदार त्यांना सोडून गेले आहेत. पहिली आणि दुसरी फळीच उलटली आहे. आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यासारखे त्यांचे पट्टशिष्य माध्यमांसमोर भावनिक बोलण्यात प्रसिद्ध आहेत; परंतु केवळ भावनेच्या बळावर निवडणुका जिंकता येत नाहीत. जनतेला शरद पवारांचा खरे–खोटेपणा कळाला आहे. इतिहासातील त्यांच्या राजकीय चुका लोकांसमोर आहेत. राजकीय विश्वासार्हता त्यांनी कधीच गमावली आहे.स्वर्गीय वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसत पाडापाडीचे राजकारण असो, सन २०१४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने न मागताही देवेंद्र फडणवीस सरकारला समर्थन देऊ केल्याचे राजकारण असो वा शिवसेना (ठाकरे), काँग्रेसला सोबत घेत बांधलेली आघाडीची मोट असो, तेव्हा पवारांना भाजपचा जातीयवाद आणि शिवसेनेबरोबर महाविकास आघाडी सरकार स्थापताना तिची धर्मांधता त्यांना खटकली नाही.

# परिघावरचे लोक हाच इथल्या राजकारणाचा मुख्य प्रवाह

महाराष्ट्रात शिवाजी महाराजांबद्दलची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यांच्या काही लष्करी मोहिमा सुरू होत्या. त्यात काही केल्या यश येत नव्हते. या मोहिमांदरम्यान फिरत असताना एका वृद्ध स्त्रीच्या घरी जेवणासाठी महाराज थांबले होते. आपल्याकडे जेवायला थांबलेल्या माणसांमध्ये शिवाजी महाराज आहेत हे त्या वृद्धेला काही ठाऊक नव्हते. तिने महाराजांना एका ताटात गरम गरम खिचडी घालून दिली. ताटात मध्यभागी असलेल्या खिचडीपासून त्यांनी खायला सुरुवात केली. मध्यभागी गरम असलेल्या खिचडीमुळे त्यांची बोटे भाजत होती. ते बघून ती वृद्धा म्हणाली, अरे बाबा, तू तुझ्या राजासारख का करतो आहेस? तो बघ, शत्रूच्या प्रदेशाच्या मध्यभागी हल्ला करण्याचा प्रयत्न करतो आणि प्रत्येक वेळी अपयशी ठरतो. खिचडी आधी बाजूबाजूने खायला सुरुवात कर आणि मग मध्यभागी जा. तुझ्या राजाला पण सांग' ते ऐकून शिवाजी महाराजांनी खिचडी बाजूबाजूने खायला सुरूवात केली आणि भविष्यातील सर्व लष्करी मोहिमांबाबतही तेच केले. बाकी इतिहास सगळ्यांनाच माहीत आहे.राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा हा त्या सल्ल्याचे पालन करण्याचा आणि आधी परिघावरून देश व्यापण्याचा प्रयत्न करते आहे का? मणिपूरच्या यात्रेत सामील झाल्यावर मला याची जाणीव झाली. ईशान्येकडील राज्यांमध्ये कोणतीही निवडणूक नसताना तिथे यात्रा कशाला सुरू करायची असा राजकीय पंडितांचा प्रश्न होता. पण राहुल गांधींनी ही यात्रा ईशान्य आणि मणिपूरमधूनच सुरू केली पाहिजे असा आग्रह धरला. खरेतर ही निवड राजकीयदृष्ट्याच नाही तर सुरक्षिततेच्या पातळीवरही धोकादायक होती. मणिपूर अजूनही धुमसतच आहे आणि उघडउघड काम करणाऱ्या किंवा भूमिगत राहून काम करणाऱ्या अशा कोणत्याही अतिरेकी गटासाठी, ही यात्रा हे अगदी सोपे लक्ष्य होते. याशिवाय, सुमारे दशकभरापूर्वी ईशान्येकडील डोंगराळ राज्यांमध्ये काँग्रेसची जी परिस्थिती होतीत, तशी आज तिथे नाही. यात्रेसाठी गर्दी जमवण्यासाठी ते पक्ष संघटनेवर अवलंबून राहू शकत नव्हते. राहुल गांधींसाठी हा नैतिक–वैचारिक मुद्दा होता. मणिपूरमध्ये सध्या एक प्रकारचं नागरी युद्धच सुरू आहे. हे राज्य त्यात ते होरपळून निघतं आहे. अत्यंत वाईट प्रकारचा राजकीय अन्याय सहन करणाऱ्या या राज्याला वगळून तुम्ही न्याय यात्रा केली असे होऊ शकत नाही.दावोस ठीकच; पण बदलत्या जगात भारत– आणि चीन– काय करणार?लोकांच्या प्रतिसादातून हा मुद्दा किती धोकादायक होता ते अधोरेखित झाले. 'नोशनल मीडिया' (माझ्या भाषेत सांगायचे तर नॉयडा बेस्ड नॅशनल मीडिया चॅनेल्स)ने या यात्रेवर एक प्रकारे बहिष्कार घातलेला असल्यामुळे राहुल गांधींच्या स्वागतासाठी होणारी सामान्य लोकांची गर्दी पाहण्यासाठी तुम्हाला यूट्यूबकडे वळावे लागेल. गेल्या काही महिन्यांत सर्वाधिक हिंसाचारग्रस्त असलेल्या सेनापती जिल्ह्यातील कुकींच्या भागात यात्रा पोहोचली तेव्हाचे दृश्य तर मी कधीही विसरणार नाही. आदल्या दिवशी संध्याकाळी मैतेई भागात यात्रेचे नेत्रदीपक स्वागत झाले होते यात काही शंकाच नाही, पण कुकींच्या परिसरातील स्वागत हा आयुष्यात कधीतरीच मिळतो असा अनुभव होता. यात्रेच्या मार्गावरच्या आणि आजूबाजूच्या गावांमधले गावकरी रस्त्याच्या कडेला जमत, त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रूही असत आणि आशाही. या देशाचे नागरिक म्हणून देशातील घडामोडींशी जोडून घेण्यासाठी ते आतुर असल्याचे दिसत होते. यात्रेमध्ये येऊन स्त्रियांनी त्यांचे मन मोकळे केले. मुले पोस्टर्स घेऊन उभी होती. सामाजिक कार्यकर्त्यांनी या हिंसाचाराचा दीर्घकालीन परिणाम लोकांसमोर मांडला. काही समूहांच्या नेत्यांनी आपल्या मागण्या मांडल्या. तिथे दु:ख, कटुता आणि राग होता, पण राहुल गांधी त्यांच्या जखमा भरतील ही आशाही होती. माझ्यासाठी हा राष्ट्रीय एकात्मतेचा प्रत्यय होता.हे सगळं मणिपूरपुरतं आणि तात्पुरतं नाही, याचा अनुभव आला तो नागालँडमध्ये. तिथे आम्ही यात्रेच्या थोडं पुढे जाऊन वोखा नावाच्या एका छोट्याशा गावात पोहोचलो. तिथे आम्ही राहुल गांधी येण्याची वाट पाहत असलेल्या लोकांशी बोलत होतो. चहाच्या स्टॉलच्या मालकाने आम्हाला त्याच्याकडची आलू पुरी खाण्याचा आग्रह धरला. आमच्यासारख्या यात्रींकडून पैसे घ्यायला त्याने नकार दिला. यात्रेची, राहुल गांधींची केवळ एक झलक पाहण्यासाठी महिला आपल्या मुलांसह बराच वेळ थांबल्या होत्या. शहरातील प्रत्येकजण रस्त्यावर किंवा गच्चीवर होता. देशात कुठेही याआधी यात्रेचं जसं स्वागत झालं किंवा यापुढेही होईल, तसंच इथेही होत होतं. ते बघून हे नागालँड आहे, हे क्षणभर विसरायला होत होतं. हो, तेच नागालॅण्ड जिथे देशावरुद्धचे पहिले बंड झाले होते. हे तेच नागालॅण्ड होते, जिथे देशामधल्या एखाद्या वेगल्या राज्यामधल्या माणसाला अजूनही विचारले जाते, 'तुम्ही भारतातून आला आहात का?', हे तेच नागालॅण्ड होते, जिथे अजूनही भूमिगत अतिरेकी गटांचे वर्चस्व आहे. लोक यात्रेला अशा पद्धतीने प्रतिसाद देत होते की इथल्या ४० सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेसचा एकही आमदार नाही हे तुमच्या लक्षातही येणार नाही. अरुणाचल आणि मेघालयमध्ये काँग्रेस पक्ष अजूनही महत्त्वाचा आहे, त्यामुळे तिथे हा फरक फारसा जाणवत नव्हता. परंतु न्याय यात्रेचे ज्या पद्धतीने स्वागत झाले, तिला ज्या पद्धतीने प्रतिसाद मिळाला, तो पाहता काँग्रेस पक्षाची संघटनात्मक किंवा निवडणुकीच्या रिंगणामधली ताकद स्पष्टपणे अधोरेखित झाली. मला भारत जोडो यात्रेमधला कन्याकुमारीत जमलेला लोकसागर आणि काश्मीर खोऱ्यातील दृश्ये आठवली.भारत जोडोची सुरुवात भौगोलिक परिघापासून होणेच योग्य आहे. त्याबरोबरच काँग्रेस पक्षाबद्दल लोकांच्या मनात आजही असलेले प्रेम आणि परिघावरच्या लोकांशी राहुल गांधी ज्या पद्धतीने भावनिक पातळीवर जोडून घेतात, त्याला या सगळ्याचे श्रेय आहे.परिघावर किंवा मुख्य प्रवाह आसाममध्ये प्रवेश करून 'चिकन नेक' ओलांडल्यावर 'परिघा'वरून जाणाऱ्या या यात्रेचे रुपडे पालटले. पहिल्या यात्रेप्रमाणेच हिचेही सामाजिक पातळीवर परिघावर असलेल्या लोकांशी विशेष नाते आहे. आणि हे केवळ धार्मिक अल्पसंख्याकच नाहीत. राहुल गांधी लोकांना प्रतीकात्मक पातळीवर खूश करण्यासाठी कोणतेही उठून दिसतील असे प्रयत्न करत नसले तरी मुस्लिमांशी त्यांचा नैसर्गिक बंध आहे यात शंका नाही. भाजपच्या प्रपोगांडाची पद्धत पाहता यात्रेच्या मार्गासंदर्भात मुस्लिम लोकसंख्या असलेल्या भागांना विशेष प्राधान्य दिलेले नाही (किशनगंज आणि मालदा या मार्गात काँग्रेसचे विद्यमान खासदार आहेत). दर्ग्यांना भेटी दिल्या जात नाहीत, दाढीवाल्या पाद्रींचा समूह भेटायला येत नाही, राहुल गांधी यांच्या भाषणात शेर–ओ–शायरी नसते, नेहमीच्या नमस्तेपलीकडे यात्रेत काहीही नसते. असे असले तरी, एखाद्या सामान्य मुस्लिमाला समजू शकते की समान नागरिकत्व हा त्याचा हक्क आहे. आरएसएस–भाजप यंत्रणेविरुद्ध लढण्यासाठीपारंपारिक 'सेक्युलर' नेत्यांपेक्षा राहुल गांधींवर अधिक विश्वास ठेवला जाऊ शकतो. मुस्लीम मोठ्या संख्येने गर्दी करतात, राहुल गांधींनी उच्चारलेल्या प्रत्येक शब्दावर विसंबून राहतात, राहुल गांधी जे बोलतात, त्यातल्या 'बिटवीन द लाइन्स' त्यांना समजतात आणि राहुल गांधींच्या म्हणण्याला ते आनंदाने पाठिंबा देतात.या न्याय यात्रेने आपले लक्ष प्रामुख्याने सामाजिक–आर्थिक शिडीवरील शेवटच्या व्यक्तीवर केंद्रित केले आहे. हा समाजामधला सगळ्यात तळागाळातला माणूस आहे. आदिवासी, दलित आणि हातावर पोट असणाऱ्यांमध्ये राहुल गांधी खऱ्या अर्थाने सहजपणे वावरतात, हे यातून समजायला मदत होते. आदिवासींसोबतचा त्यांचा नैसर्गिक बंध भाजपच्या वनवासी राजकारणाला धक्का देतो. भारतातील उच्च जातींच्या संदर्भात ते व्यवस्थेला सतत विचारत असलेले प्रश्न कदाचित सामान्य दलित आणि इतर मागासलेल्या समुदायांपर्यंत पोहोचत नसतील, पण ओबीसी, दलित आणि आदिवासी कार्यकर्त्यांवर त्याचा परिणाम होतो. आसाममधील चहाच्या बागेतील कामगार आणि पोटापाण्यासाठी बोट चालवण्याचा व्यवसाय करणारे, पश्चिम बंगालमधील मनरेगा कामगार, बिहारमधील शेतकरी, कोळसा कामगार आणि झारखंडमधील कोळसा व्यापारी यांच्या भेटीतून संरक्षित लाभार्थ्यांचे राजकारण आणि खरी प्रतिष्ठा तसेच अधिकार यातील फरक समोर येतो. राहुल गांधींना या सगळ्याचा होऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये फायदा होईल की नाही, हे सांगणे कठीण आहे. पण हे देशातील सध्याच्या वर्चस्ववादी राजकारणाच्या विरोधात वातावरण निर्माण करत आहे आणि त्याची देशाला या घडीला खूप गरज आहे.हे कदाचित कट्टर राजकारण्यांवर परिणाम करू शकणार नाही. ते विचारतील की हे सगळे ठीक आहे, पण मुख्य प्रवाहातील राजकारणाचे काय? हे परिघावरचे राजकारण असे किती महत्त्वाचे आहे? खरे मुख्य प्रवाहातले राजकारण यापेक्षा कितीतरी वेगळे आहे. भाजपची राजकीय ताकद, ते नियंत्रित करत असलेले पैसा आणि प्रसारमाध्यमे यांचे घातक मिश्रण, त्यांची रणनीती आणि संघटनात्मक यंत्रणा यांचा सामना या माध्यमातून कसा करणार?इथेच परिघाचे रूपक पूर्णपणे बदलते. अगदी खाली डोके वर पाय इतके बदलते. अमेरिकेतील कृष्णवर्णीय आणि इतर वांशिक अल्पसंख्यांकांच्या बाबतीत आहे तसे भारतात नाही. इथे दलित, आदिवासी, ओबीसी आणि धार्मिक अल्पसंख्याक हे बहुसंख्य आहेत. सवर्ण हिंदू हे अल्पसंख्याक आहेत. युरोपियन राजकारणातील कामगार–वर्गाला समांतर राजकारण इथे नाही. कारण इथे तो वर्ग लोकसंख्येच्या तीन चतुर्थांशपेक्षा जास्त आहे. तथाकथित 'मध्यमवर्गा'चे प्रमाण कष्टकरी वर्गाच्या तुलनेत कमी आहे. भारतात, परिघावरच्या लोकांचे राजकारण हेच मुख्य प्रवाहाचे राजकारण आहे. इथला मुख्य प्रवाहच परिघावर आहे.



# विज्ञानातील रुची का घटतेय?

देशातील शास्त्रज्ञांना आपण खेळाडू, अभिनेता, नोकरदार किंवा एखाद्या नेत्याप्रमाणे आदर्श समजत नाहीत. अनेक पातळीवर विज्ञानापेक्षा खेळाला अधिक महत्त्व दिले जाते. परिणामी पुरेसा सन्मान मिळत नसल्याने तरुण शास्त्रज्ञ परदेशात निघून जात आहेत. साहजिकच हे चित्र बदलण्यासाठी देशात संशोधन आणि शोध याची संस्कृती विकसित व्हावी असे वातावरण तयार करणे गरजेचे आहे. ही दिवसांपूर्वीच्या एका संशोधनात दक्षिण भारतातील विद्यार्थी विज्ञान विषयाला प्राधान्य देतात तर उत्तर भारतातील विद्यार्थी कला वर्गातील विषयाला प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या सर्वेक्षणानुसार २०२२ मध्ये अकरावी आणि बारावीच्या विविध राज्य शिक्षण मंडळाने दिलेल्या आकडेवारीनुसार तामिळनाडू, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात अनुक्रमे १.५३, २.०१ आणि २.१९ टक्के विद्यार्थ्यांनी कला अभ्यासक्रमाच्या विषयांना महत्त्व दिले तर त्याचवेळी पश्चिम बंगाल, पंजाब, हरियाणा, गुजरात आणि झारखंडमध्ये विज्ञान विषयाला अनुक्रमे १३.४२, १३.७१, १५.६३, १८.३३ आणि २२.९ टक्के विद्यार्थ्यांनी पहिली पसंती दिली. याउलट कला विषयाला गुजरातमध्ये ८१.५ टक्के, बंगालमध्ये ७८.९४ टक्के, पंजाबमध्ये ७२.८९ टक्के, हरियाणात ७६.७६ टक्के आणि राजस्थानात ७१.२३ टक्के विद्यार्थ्यांनी प्राधान्य दिले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद म्हणजेच 'एनसीईआरटी'चा सहयोगी विभाग 'परख' सध्या या आकडेवारीचे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक विश्लेषण करणार आहे. परंतु समाज आणि शिक्षणतज्ज्ञांनी देखील या आकडेवारीचा अभ्यास करण्याची गरज आहे. सध्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा व्यक्तींवर आणि समाजाच्या प्रत्येक पातळीवर प्रभाव पडत असताना आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा हस्तक्षेप वाढत असताना विज्ञान आणि कला विषयावरून असणारी असमानता चिंताजनक कशामुळे? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. भारतात शास्त्रज्ञांची कमतरता राहण्याचे मूळ कारण देखील या विसंगत आकडेवारीत दडलेले आहे. शिवाय मूलभूत संशोधनाच्या क्षेत्रात पेटंटची संख्या वाढण्याची गती ही कशामुळे संथ राहत आहे, हे देखील कळते.विज्ञानाच्या क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचे सरकारकडून प्रयत्न केले जात असले तरी देशातील बहुतांश सर्व आघाडीच्या संस्थांत शास्त्रज्ञांची उणीव भासते. सध्याच्या काळात देशात ७० प्रमुख संशोधन संस्था असून त्यातील ३२०० पदे रिक्त आहेत. बंगळुरू येथील विज्ञान आणि औद्योगिक संशोधन परिषदेशी (सीएलआयआर) संबंधित संस्थांत सर्वाधिक १७७ जागा रिक्त आहेत. पुण्यातील राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळा (एनसीएल) येथे १२३ शास्त्रज्ञांच्या जागा रिकाम्या आहेत. विशेष म्हणजे सरकारकडून भरपूर सुविधा, सवलती आणि आकर्षक पॅकेज दिले जात असतानाही या जागा रिक्त राहत आहेत. त्याचबरोबर परदेशात कार्यरत असलेल्या शास्त्रज्ञांना स्वदेशी आल्यास आकर्षक वेतन आणि भत्ते देण्याचा प्रस्ताव आहे. असे असतानाही विद्यार्थी भारतात संशोधन करण्यास तयार नाहीत. परिणामी परदेशातून शास्त्रज्ञही मायदेशी परतताना दिसत नाहीत. अशी स्थिती तयार होण्यामागची पार्श्वभूमी म्हणजे एकतर शास्त्रज्ञांमध्ये सरकारच्या प्रस्तावावर विश्वास नसल्याचे दिसते. कारण या सुविधा पुढेही कायम राहतील, यावर त्यांना खात्री नाही आणि दुसरे म्हणजे नोकरशाहीकडून आडकाठी आणण्याची प्रवृत्ती. त्यामुळे शास्त्रज्ञ मायदेशी येण्यास बिचकत आहेत.सध्याच्या काळात कोणताही देश हा शास्त्रज्ञांच्या भरीव कामगिरीच्या आधारावर सक्षम अणि प्रबळ होण्याची क्षमता राखतो. मानवी जीवन सुस करताना संशोधन सुखद आणि समृद्ध करते. भारतात तरुण प्रतिभा किंवा शिक्षित बेरोजगारीचा भडिमार आहे. तरीही शास्त्रज्ञ होण्यात किंवा संशोधन करण्यात रस घेणा–या तरुणांची संख्या ही कमीच राहत आहे. यामागचे आणखी एक कारण म्हणजे शास्त्रज्ञांना आपण सेलिब्रिटीप्रमाणे समजत नाहीत. अनेक ठिकाणी विज्ञानापेक्षा खेळाला अधिक झुकते माप दिले जाते. प्रतिष्ठा न मिळणे, सन्मान न मिळणे या कारणांमुळे देखील शास्त्रज्ञ देशाबाहेर जात असल्याचे आढळून येते. साहजिकच आपल्याला शास्त्रज्ञाप्रती आणि संशोधनाप्रती सकारात्मक वातावरण तयार करणे गरजेचे आहे. देशाच्या, मानवाच्या विकासासाठी अहोरात्र संशोधन कार्यात असलेल्या व्यक्तींना महत्त्व देणे गरजेचे आहे. मात्र काहीवेळा शास्त्रीय ज्ञान नसल्याने त्यांच्या संशोधनाला मान्यता मिळत नाही आणि त्यांच्या पदरी निराशा पडते. वास्तविक आपल्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सरकारचे वर्चस्व आहे आणि त्यामुळे जोखीम घेण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव दिसून येतो. शास्त्रज्ञांचे संशोधन हे कल्पकता, पारदर्शकतेवर अवलंबून असते. या गोष्टी जोखीम उचलल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.आज जागतिकीकरणाच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन आणि विकासाला अधिक महत्त्व दिले जात आहे. परंतु उदारमतवादी अर्थव्यवस्थेची दुसरी नुकसानकारक बाजू म्हणजे आपल्या उच्च दर्जाच्या विज्ञान शिक्षण संस्था या हुशार लोकांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरताना दिसत नाहीत. आपल्यातील बुद्धिवंत एकतर परदेशात जात आहेत किंवा इंजिनीअरिंग करत एमबीए करत खासगी बँका, विमा कंपन्या किंवा अन्य व्यवस्थापन संस्थेत रुजू होताना दिसतात. म्हणजेच प्रतिभावान लोक शास्त्रोक्त आणि पायाभूत शिक्षण घेऊनही करिअर साकारताना त्यांना अगदी उलट काम करावे लागते. म्हणजेच अभियंता हा बँकर होतो तर डॉक्टर प्राध्यापक होतात. असे विरोधाभासात्मक चित्र आणि संस्कृती पाहिल्यास ही एकप्रकारे प्रतिभावान लोकांची हेटाळणी केल्यासारखी आहे. एकेकाळी विज्ञान संस्थांत पैशाची चणचण असायची. मात्र आता या संस्थांकडे निधी अणि स्रोतांची विपुलता असतानाही तरुण शास्त्रज्ञ याकडे पाठ फिरवत आहेत. त्यामुळे आपली संशोधन कार्यात आणि संस्कृतीत पीछेहाट राहू शकते. आजच्या काळात होणा–या संशोधन आणि शोधाचे आकलन केल्यास ते मागच्याच काळात झालेल्या शोधांची सुधारित आवृत्ती दिसून येते. थोडाफार बदल करून ते पुन्हा नव्याने आणण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. अर्थात ही प्रवृत्ती चिंताजनक आहे. जगातील आघाडीच्या २०० विद्यापीठांत भारताच्या संस्था जागा मिळवण्यासाठी धडपड करत आहेत.१९३० मध्ये भारतावर इंग्रजांचे राज्य होते आणि तेव्हा संशोधनाची पायाभूत सुविधा असून नसल्यासारखी होती. विचारांना दिशा देणारे साहित्य देखील पुरेसे नव्हते. इंग्रजी शिक्षण देखील बाल्यावस्थेत होते. तरीही सी. व्ही. रमण यांनी साध्या उपकरणाच्या आधारे तसेच देशातील उपलब्ध ज्ञान अणि भाषेचा आधार घेत संशोधन कार्य केले आणि भौतिकशास्त्रात देशाला नोबेल मिळवून दिले. सत्येंद्रनाथ बसू यांनी आईन्स्टाईन यांच्यासमवेत काम केले. मेघनाद साहा, रामानुजन, पी. सी. रे आणि होमी जहाँगीर भाभा यांनी देखील संशोधनात अतुलनीय योगदान दिले. रामानुजन यांनी मांडलेल्या थेरमचा अर्थ आजही शंभर वर्षांनंतरही लवकर समजत नाही. डॉ. एपीजे अब्दुल कलाम आणि के. शिवम यांच्यासारख्या शास्त्रज्ञांनी मातृभाषेत शिक्षण घेऊन संशोधनात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. जगदिशचंद्र बोस यांनी स्वत: तयार केलेल्या उपकरणाच्या माध्यमातून झाडांच्या आयुष्याचा शोध घेतला आणि जगाला आश्चर्याचा धक्का दिला. आता उच्च शिक्षणात अनेक प्रकारच्या गुणवत्तापूर्ण सुधारणा होऊनही दर्जेदार नवीन संशोधन करताना अडचणी येत आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपण अजूनही पाश्चिमात्यांचा प्रभाव झुगारलेला नाही. अर्थात भारताने अंतराळ मोहिमेत मोठी कामगिरी केली आहे. यात स्वदेशी उपकरणांचा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे.वास्तविक गेल्या सात दशकांतील शिक्षण प्रणालीतील घोकंपट्टीचा प्रघात हा मोठा अडसर ठरत आहे. म्हणूनच पुरेशा प्रमाणात विद्यार्थ्यांत तार्किकता, आकलनशक्ती किंवा क्षमता, संशोधनवृत्ती, मूल्यमापन क्षमता विकसित होऊ शकली नाही. दुसरे म्हणजे संपूर्ण शिक्षण हे विचारवंत आणि ज्ञानाभिमुख करण्याऐवजी नोकरी अणि करिअरच्या दृष्टीने विकसित केले आहे. आपल्या शिक्षण पद्धतीत कल्पनाशक्तीला चालना देणा–या स्रोतांचा शोध घेण्याची प्रवृत्ती विकसित करणारे अध्यापन कौशल्य अभावाने दिसते. इंग्रजीचा दबाव देखील नैसर्गिक प्रतिभावंतांना संकुचित करत आहे. अमेरिका, रशिया, चीन, जपान यासारख्या अन्य देशांच्या तुलनेत आपली संशोधन क्षेत्रातील पीछेहाट पाहता त्यांच्याकडून शिकायला हवे. संबंधित देशात विज्ञान आणि तंत्रज्ञान हे त्यांच्या मातृभाषेतून दिले जाते.परदेशात संशोधन आणि शोधकार्य हे विद्यापीठ पातळीपासून सुरू होते. शास्त्रोक्त शिक्षण न घेतलेला विद्यार्थी एखादे संशोधन करत असेल तर त्याचे यश तेथील संस्था मान्य करतात आणि त्याला विकसित करतात. आपल्याकडे अशा कार्यांना मान्यता देणे किंवा प्रोत्साहन देण्याचे होत नाही. देशात जोपर्यंत शास्त्रज्ञांना अनुकूल वातावरण तयार होत नाही आणि संस्कृती विकसित होत नाही, तोपर्यंत अन्य देशांच्या तुलनेत आपण पुढे जाणे शक्य नाही. त्याचवेळी देशात तरुण शास्त्रज्ञही तयार होणार नाहीत. विज्ञानाची गोडी लावणारा आणि संशोधन कार्यास प्रोत्साहित करणारा अभ्यास नसल्याने अशा प्रकारच्या कटूसत्याला आपल्याला सामोरे जावे लागत आहे.



# अँटिबायोटिक्स निकामी होताहेत, सावधान!

वैश्विक खेडे झालेल्या या जगासमोर कोणकोणती आव्हाने आहेत आणि त्या आव्हानांना मानव समाज म्हणून आपल्याला कसे तोंड देता येईल, या संदर्भात विविध आंतरराष्ट्रीय संस्था महत्त्वाचे काम करत असतात. आरोग्याच्या अनुषंगाने जागतिक आरोग्य संघटना देखील हे काम करत असते. आजच्या जगासमोरील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने मानवतेला भेडसावणारे जे दहा महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यामध्ये सूक्ष्मजीव विरोधी औषधांना निर्माण होणारा वाढता प्रतिरोध (न्टीमायक्रोबियल रेजिस्टन्स) हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. शाश्वत विकासाची जी ध्येये आपण गाठू इच्छितो त्या मार्गावरील अनेक महत्त्वाच्या अडचणींपैकी ही एक महत्त्वाची अडचण आहे. सूक्ष्मजीव विरोधी औषधांमध्ये अँटिबायोटिक्स, विषाणूविरोधी औषधे, बुरशी विरुद्ध काम करणारी औषधे आणि परजीवी विरुद्ध काम करणारी औषधे अशा अनेक प्रकारच्या औषधांचा समावेश होतो. सध्या या सर्वच औषधांना वेगाने प्रतिरोध वाढताना दिसतो आहे. त्यामुळे अनेक किंवा सर्वच प्रकारच्या औषधांना न जुमानणारा सुपरबग ही केवळ विज्ञान कथेतील काल्पनिक बाब राहिलेली नसून हा सुपरबग जगभर अनेक रुग्णांमध्ये आढळतो आहे. महत्वाची अशी अँटिबायोटिक्स या प्रतिरोधामुळे निकामी होत असल्याने दिवसेंदिवस जंतुसंसर्गावर उपचार करणे कठीण होत चाललेले आहे कारण नवीन अँटिबायोटिक्स फार सहजतेने मिळत नाहीत. नवीन अँटिबायोटिक्स शोधण्यासाठी संशोधन प्रक्रियेचा खर्च देखील अव्वा की सव्वा आहे त्यामुळे या प्रकारातील नवीन औषधे सापडण्याचा वेग अत्यंत मंद आहे. अनेक गरीब देशांना संशोधनासाठी एवढा खर्च करणे परवडत देखील नाही. अशावेळी आपण आपल्या हातातील आहेत ती उपयुक्त सूक्ष्मजीव विरोधी औषधे गमावणे अत्यंत आत्मघातकी आहे. यामुळे जंतू संसर्ग झालेल्या रुग्णांवर उपचार करणे कठीण तर होतेच आहे पण त्याचबरोबर सिजेरियन शस्त्रक्रिया, सांधे बदलण्याच्या शस्त्रक्रिया, कॅन्सरवरील किमोथेरपी, अवयव प्रत्यारोपण अशा माणसाला संजीवन देणाऱ्या महत्त्वाच्या शस्त्रक्रिया करणे देखील दिवसेंदिवस अधिक जोखमीचे होत चालले आहे.सूक्ष्मजीव विरोधी औषधांना प्रतिरोध निर्माण होण्याची मुख्य कारणे काय आहेत ?या औषधांचा बेसुमार,वारेमाप वापर हे त्याचे मुख्य कारण आहे. ही औषधे जपून आवश्यक तेव्हाच आणि योग्य प्रमाणात योग्य कालावधी करता वापरली पाहिजेत परंतु असे होताना दिसत नाही.स्वच्छ पाणी, सार्वजनिक स्वच्छता यांचा अभाव हे देखील असा प्रतिरोध वाढण्याचे एक मुख्य कारण आहे.आरोग्य संस्थांमध्ये आणि शेतामध्ये जंतुसंसर्ग प्रतिबंध आणि नियंत्रण संदर्भातील परिणामकारक उपाययोजना न राबवणे.गुणवत्तापूर्ण आणि सर्वसामान्यांना परवडणारी औषधे, लसी प्रयोगशाळा चाचण्या सहजतेने उपलब्ध नसणे.सूक्ष्मजीव विरोधी औषधांना होत असलेल्या प्रतिरोधाबाबत जागृती आणि माहिती नसणे.या संदर्भातील विविध कायद्यांचे काटेकोर पालन न केले जाणे.अशा अनेक कारणांमुळे हा प्रतिरोध वाढतो आहे. सूक्ष्मजीव विरोधी औषधांना निर्माण होणारा प्रतिरोध ही काही प्रमाणामध्ये निसर्गतः होणारी गोष्ट आहे. आपल्यामध्ये आवश्यक ते जनुकीय बदल करून सूक्ष्मजीव हा प्रतिरोध निर्माण करतात हे खरे आहे तथापि वर नमूद केलेल्या कारणांमुळे या प्रतिरोधाचे प्रमाण विलक्षण गतीने वाढते हे आपण लक्षात घेतले पाहिजे.सूक्ष्मजीव विरोधी औषधांना निर्माण होणारा प्रतिरोध नेमक्या कोणत्या औषधांना आणि कोणत्या सूक्ष्मजीवांचा आहे याची अचूक माहिती मिळून त्यानुसार कार्यवाही करणे शक्य व्हावे यासाठी जागतिक पातळीवर या संदर्भात सर्वेक्षण यंत्रणा तयार करण्यात आलेली असली तरी देखील हे सर्वेक्षण अजून पुरेसे विश्वव्यापी झालेले नाही. जगातील कसेबसे पन्नास एक देश यासंदर्भातील माहिती गोळा करत आहेत. अँटिबायोटिक्सना निर्माण होणाऱ्या या प्रतिरोधामुळे टीबी अर्थात क्षय आजाराचे नियंत्रण अधिक कठीण झाले आहे. टीबीवरील अनेक औषधांना दाद न देणारे लक्षावधी रुग्ण जगभरात आढळून येत आहेत. भारतासाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक आहे कारण जगभरातील एकूण टीबी रुग्णांपैकी सुमारे २५ टक्के रुग्ण आपल्या देशात आढळतात. आजच्या घडीला देशभरात जवळपास २८ लाख टीबी रुग्ण आहेत. टीबी रुग्णांमध्ये प्रतिरोधाचे प्रमाण सुमारे चार ते पाच टक्के आहे. टीबी रुग्णांमधील अँटिबायोटिक्स प्रतिरोधाचे हे प्रमाण असेच वाढत गेले तर टीबी नियंत्रण आपल्याकरता कठीण गोष्ट होऊन बसणार आहे. १९५०च्या पूर्वी ज्याप्रमाणे टीबी रुग्णांसाठी शहराबाहेर वेगळी रुग्णालय असत ती अवस्था येण्याचा धोका या प्रतिरोधामुळे निर्माण झालेला आहे.एच आय व्ही एड्स वरील औषधांमध्ये देखील प्रतिरोध निर्माण होताना दिसतो आहे. मलेरिया साठी कारणीभूत असलेल्या परजीवींपैकी अधिक धोकादायक असणाऱ्या फाल्सीपारम मलेरियामध्ये नेहमीच्या औषधाविरुद्ध निर्माण होणारा प्रतिरोध मलेरिया नियंत्रणातील मोठा अडथळा आहे.अँटीबायोटिक्सच्या वापराबाबतची भारतातील परिस्थिती आपण सर्वांनी काळजी करावी अशी आहे २०१० ची जरी आकडेवारी आपण पाहिली तरी अँटिबायोटिक्सची जवळपास १३ अब्ज युनिट्स आपण देशभरात वापरली. याचा अर्थ सर्व




जगभरात भारतातील अँटिबायोटिक्सचा वापर सर्वाधिक आहे. भारतात अँटिबायोटिक्सना वाढत्या प्रतिरोधाची कारणे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.आपल्याकडे मेडिकल स्टोअरमध्ये डॉक्टरांच्या कोणत्याही प्रिस्क्रिप्शन शिवाय अँटिबायोटिक्स सहजतेने उपलब्ध होतात. दुकानदाराच्या किंवा इतर कोणाच्यातरी सल्ल्याने अनेकदा रुग्ण स्वतःहून अँटिबायोटिक्स घेतात. अँटिबायोटिक संवेदनशीलता चाचणी किंवा ब्लड कल्चर यासारख्या प्रयोगशाळा तपासण्या सहजतेने उपलब्ध नसल्यामुळे अनेकदा डॉक्टर आपल्या अनुभवानुसार अँटिबायोटिकचा वापर करत असतात. प्रमाणापेक्षा जास्त वापर करण्यासोबतच अनेकदा ती अपुऱ्या डोस मध्ये दिली जाणे, यामुळे सुद्धा प्रतिरोध निर्माण होतो. रुग्णाला कदाचित बॅक्टेरियामुळे संसर्ग झाला असेल आणि तो आपल्याकडून उपचार करावयाचा राहू नये या भीतीने अनेकदा डॉक्टर गरज नसताना रुग्णाला अँटिबायोटिक्स देतात. अँटिबायोटिक्स वापराबाबत अन्न आणि औषध प्रशासनाची नियामक यंत्रणा अपुरी असल्यामुळे तसेच मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने याबाबतचे नियमन काटेकोरपणे केले जात नाही हाही एक महत्त्वाचा मुद्दा आहे. अँटिबायोटिक्स औषध ओळखण्याची सोपी खूण म्हणजे या औषधाच्या स्ट्रीपवर लाल रंगाची ठळक रेघ ओढलेली असते.मानवी आरोग्य विभागाशिवाय अँटिबायोटिकचा वापर पशुसंवर्धन, मत्स्य उत्पादन, शेती यामध्ये देखील केला जातो. अनेकदा तो पशु, मासे किंवा धान्य याच्या निव्वळ वाढीसाठी केला जातो. औषध कंपन्यांमधून बाहेर पडणाऱ्या कचऱ्यामुळे होणारे पर्यावरणीय प्रदूषण देखील अँटिबायोटिक्स प्रतिरोधाला हातभार लावते.सूक्ष्मजीव विरोधी औषधांना निर्माण होणारा प्रतिरोध थांबवण्यासाठी शासकीय पातळीवर आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या अनुषंगाने एक राष्ट्रीय कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. २०१७ मध्ये आपण हा प्रतिरोध रोखण्यासाठी राष्ट्रीय कृती आराखडा तयार केला आहे. त्यामुळे शासकीय पातळीवर योग्य पावले उचलली जातच आहेत. मानवी आरोग्य,शेती, मत्स्य उत्पादन, पशुसंवर्धन आणि पर्यावरण हे सारे विभाग एकमेकांशी समन्वय साधून याबाबतीत योग्य कार्यवाही करत आहेत मात्र या सगळ्या गोष्टी आपण केवळ शासनावर सोडून चालणार नाहीत. आपले आरोग्य ही आपली व्यक्तिगत आणि कौटुंबिक जबाबदारी देखील आहे आणि म्हणून आपल्या आजारपणामध्ये उपयोगी पडणारी सूक्ष्मजीव विरोधी औषधे आपल्या निष्काळजीपणामुळे निकामी होऊ नयेत. यासाठी आपण देखील आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे.न्टीबायोटिक्स वाचविण्यासाठी आपण काय करू शकतो ?–डॉक्टरांनी सांगितल्याशिवाय कधीही स्वतःच्या मनाने अँटिबायोटिक्स घेऊ नयेत.–आपल्याला अँटिबायोटिक्स द्या असा आग्रह आपण डॉक्टरांना करू नये.–अँटिबायोटिक्स कोणत्या डोस मध्ये आणि किती काळाकरता घ्यावयाचे याबाबत डॉक्टरांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.–आपला उपचार पूर्ण झाल्यानंतर अँटीबायोटिक्सच्या काही गोळ्या, औषधे शिल्लक असतील तर ती इतर कोणाला देऊ नयेत.–आपल्याला जंतुसंसर्ग होऊ नये याकरिता हातांची नियमित स्वच्छता, अन्न आरोग्यदायी पद्धतीने तयार करणे, आजारी माणसाशी निकट संपर्क टाळणे, –सुरक्षित शरीरसंबंध आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक लसीकरण वेळेवर पूर्ण करणे, आवश्यक आहे.–आपण आपले अन्न तयार करताना जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेले पाच मुद्दे लक्षात ठेवावेत. स्वच्छता, कच्चे आणि शिजवलेले अन्नपदार्थ वेगवेगळे ठेवणे, अन्न पूर्ण शिजवणे, तयार झालेले अन्न योग्य तापमानामध्ये ठेवणे, अन्न तयार करण्यासाठी स्वच्छ आणि सुरक्षित पाणी व कच्चे पदार्थ वापरणे.समाज, शासन आणि व्यक्ती म्हणून आपण हातामध्ये हात घेऊन काम केले तर सूक्ष्मजीवाविरुद्ध लढणारी आपली औषधे आपण सुरक्षित ठेवू शकू आणि आपले आरोग्य देखील जपू शकू. म्हणूनच याबाबतीत सर्वसामान्य नागरिक, डॉक्टर्स, हॉस्पिटल्स पशुसंवर्धन मत्स्य उत्पादन आणि शेती क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी सूक्ष्मजीव विरोधी औषधांचा वापर काटेकोरपणे आणि नियमानुसारच करण्याची गरज आहे.

## प्रसिद्ध सायकलपटूचे वयाच्या ४५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन; तीव्र प्रकारच्या व्यायामाचा हृदयावर कसा परिणाम होतो?


जेव्हा तुम्हाला तुमच्या हृदयाची क्षमता माहिती नसते तेव्हा अतिप्रमाणात शारीरिक हालचाल केल्यामुळे हृदयावर ताण पडू शकतो. त्याविषयी द इंडियन एक्स्प्रेसने बंगळुरूच्या मणिपाल हॉस्पिटल येथील इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट सल्लागार डॉ. प्रदीप हरणहल्ली यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती दिली आहे. फिटनेस ट्रेनर व प्रसिद्ध सायकलपटू अनिल कदसूर यांचे वयाच्या ४५ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मृत्यूने सर्वांनाच धक्का बसला. यावरून तुम्हाला लक्षात येईल की, शारीरिकदृष्ट्या सुदृढ असणे म्हणजे हृदयाचे आरोग्य सुदृढ असणे, असे नाही. तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत कितीही शिस्तप्रिय असाल तरी हृदयाची क्षमता ही इतर अनेक घटकांवर अवलंबून आहे. जेव्हा तुम्हाला तुमच्या हृदयाची क्षमता माहिती नसते तेव्हा अतिप्रमाणात शारीरिक हालचाल केल्यामुळे हृदयावर ताण पडू शकतो. त्याविषयी द इंडियन एक्स्प्रेसने बंगळुरूच्या मणिपाल हॉस्पिटल येथील इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट सल्लागार डॉ. प्रदीप हरणहल्ली यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती दिली आहे.



शारीरिकदृष्ट्या फिट असलेल्या व्यक्तीला जर मधुमेह, उच्च रक्तदाब, खराब कोलेस्ट्रॉल किंवा कोणतीही शारीरिक समस्या असेल, तर त्या व्यक्तीलाही हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. एथलेटिक असल्यामुळे एखादी व्यक्ती शारीरिकदृष्ट्या फिट असावी, असे गृहीत धरले जाते आणि आवश्यक शारीरिक चाचण्या केल्या जात नाहीत. व्यायामामुळे तुमचे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होते; पण इतर समस्या असल्यास हृदयाशी संबंधित समस्या जाणवू शकतात.डॉ. प्रदीप हरणहल्ली सांगतात, माझ्याकडे असेही रुग्ण आले आहे की, जे धूम्रपान सोडायला तयार नाहीत. कारण– त्यांना वाटते की, ॲथलेटिक व्यायामामुळे त्यांच्या या वाईट सवयीचा आरोग्यावर परिणाम होणार नाही. मात्र, धूम्रपानामुळे रक्त घट्ट होते आणि रक्ताच्या गुठळ्या बनतात; ज्यामुळे रक्तप्रवाहात अडथळा निर्माण होतो आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.उच्च न्यायालयातील पाळणाघर न्यायापासून वंचित; प्रतिसादच नसल्याने आणि माहितीअभावी नस्तींच्या खोलीत रूपांतर कदसूर हे १०० किमी दररोज सायकल चालवायचे. पहाटे २.३० वाजता उठायचे. ३ वाजता बाहेर पडायचे. त्यानंतर सकाळी ९ वाजता ब्रेक घ्यायचे आणि पुन्हा निरोगी शरीरासाठी व्यायाम करायचे. संध्याकाळी ७ पर्यंत ते सर्व काही संपवायचे. त्यांनी लागोपाठ ४२ दिवस या सेंच्युरी राइड्स केल्या.अपूर्ण आराम आणि तीव्र व्यायाम यांमुळे कालांतराने आपल्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो. हृदयाच्या पेशींचे नुकसान होते; ज्यामुळे रक्तातील ट्रोपोनिन नावाच्या प्रोटीनची मात्रा वाढते आणि हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो.अनेकदा अतितीव्रतेने व्यायाम केल्यामुळे हृदयाची गती वाढते; ज्यामुळे अचानक हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. खेळताना किंवा तीव्र प्रकारचा व्यायाम करताना शरीरात रक्त व ऑक्सिजनची क्षमता वाढते आणि हृदयावर ताण येतो. ही बाब सायकलपटूंमध्ये जास्त दिसून येते. मॅरॅथॉनमध्ये धावतानासुद्धा धावपटूच्या हृदयावर ताण पडतो; ज्यामुळे हृदयात तीव्र वेदना जाणवतात आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो.काही वेळा तुम्हाला हायपरट्रॉफिक कार्डियोमायोपॅथी असू शकते. हायपरट्रॉफिक कार्डियोमायोपॅथी हा एक आजार आहे. या आजारामध्ये हृदयाच्या स्नायूंचा थर वाढत जातो; ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होणे, छातीत दुखणे, अनियमित हृदयाची गती इत्यादी लक्षणे दिसून येतात. त्यामुळे व्यक्तीचा मृत्यूदेखील होऊ शकतो.तीव्र प्रकारचा कोणताही व्यायाम करण्यापूर्वी नेहमी पूर्ण हृदयाची तपासणी करा. सायकल चालवल्यानंतर किंवा धावल्यानंतर शेवटी एमआरआय आणि रक्त तपासणी करा. जर तुम्ही नीट विश्रांती घेत असाल आणि हृदयाचे स्नायू बळकट असतील, तर हृदयाची क्षमता तुम्ही ओळखू शकता.एक स्पॅनिश व्यक्ती ६४० दिवस दररोज ४२ किमी धावली. त्याचे हृदय हा ताण सहन करू शकले. कारण– त्याने आधीच आरोग्याची तपासणी केली होती. हृदयाशी संबंधित धोका कमी करण्यासाठी आपल्याला ३० मिनिटे तीव्र प्रकारचा आणि एक तास सौम्य प्रकारचा व्यायाम करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर व्यायाम करताना छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अचानक थकवा जाणवणे इत्यादी लक्षणे दिसत असतील, तर लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

## थंडीत रात्री झोपण्यापूर्वी करा ‘या’ सात गोष्टी; काही दिवसांतच त्वचा होईल चमकदार अन् केस घनदाट

थंडीच्या दिवसांमध्ये बहुतेकांना कोरड्या त्वचेचा त्रास होतो. कोरडेपणामुळे त्वचेवर काळसरपणा येण्यासह पांढरे पॅच दिसू लागतात. अशावेळी दिवसभर मॉइश्चरायझर लावूनही काही परिणाम दिसत नाही. यात केसांसंबंधित समस्यादेखील वाढताना दिसतात. जसे की केसांचा कोरडेपणा, केस गळती. अशा परिस्थितीत त्वचा आणि केसांची खास काळजी घेणे फार गरजेचे असते. विशेषत: रात्रीच्या वेळी तुम्ही त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी काही गोष्टी फॉलो केल्यास काही दिवसांतच त्वचा मुलायम, चमकदार होण्यास व केस घनदाट होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे रात्रीच्या वेळी तुम्ही अशा कोणत्या सात महत्त्वाच्या गोष्टी फॉलो करणे गरजेचे आहे याविषयी वीरपरीळीझ्ळप.ले च्या संस्थापक आणि त्वचारोगतज्ज्ञ डॉ. मानसी शिरोलीकर यांनी ‘द इंडियन एक्स्प्रेस’शी बोलताना सविस्तर माहिती दिली आहे.१) बेडरुममधील वातावरण नीट ठेवा जसजसे थंड हवामान सुरू होते, तसतसे घरातील हवा कोरडी होते, ज्यामुळे तुमच्या त्वचेवर आणि केसांवर परिणाम होऊ शकतो. यामुळे तुमच्या बेडरुममधील हवेत आवश्यक आर्द्रता टिकवण्यासाठी ह्युमिडिफायरचा वापर करा. याच्या वापराने तुमची त्वचा आणि केस कोरडे होण्यापासून प्रतिबंधित करता येते. यामुळे एकंदरीत निरोगी आरोग्य ठेवता येते.२) चेहरा व्यवस्थित धुवा रात्रीच्या स्कीनकेअर रुटीनचा भाग म्हणून सॉफ्ट, हायड्रेटिंग क्लीन्सर किंवा क्लीनिंग लोशनचा वापर करा. यामुळे तुम्ही तुमच्या त्वचेतील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी न करता चेहऱ्यावरील मेकअप आणि अशुद्ध घटक प्रभावीपणे काढू शकता. विशेषत: हिवाळ्याच्या महिन्यांत जेव्हा त्वचा अधिक संवेदनशील असते आणि कोरडेपणाचा धोका असतो, तेव्हा ती अगदी सॉफ्ट पद्धतीने स्वच्छ करणे महत्त्वाचे आहे.३) रात्रीच्या वेळी स्कीनकेअर रुटीन फॉलो करा त्वचा हायड्रेटिंग ठेवण्यासाठी रात्रीच्या वेळी हायलूरोनिक सिड आणि सिरॅमाइड्स घटक असणाऱ्या स्कीन केअर प्रोडक्टचा वापर करा, यामुळे त्वचा निरोगी ठेवण्यासह मदत होते. तसेच जास्त काळ त्वचेतील हायड्रेशन टिकून राहते. विशेषतः कोरड्या त्वचेसाठी तुम्ही शिया बटर आणि ओटमील असलेले स्कीन केअर प्रोडक्ट वापरू शकता. रात्रीच्या योग्य स्कीन केअर रुटीन फॉलो केल्यास संपूर्ण हिवाळ्यात त्वचेचे निरोगी आरोग्य राखू शकता.४) त्वचेला मॉश्चराइझ करण्यास विसरू नका अंघोळीनंतर आणि झोपण्यापूर्वी ओलसर त्वचेवर बॉडीलोशन लावायला विसरू नका. फक्त चेहराच नाही तर इतर त्वचेचीसुद्धा योग्य काळजी घ्या. कोपर आणि गुडघे यांसारख्या जास्त कोरडेपणा जाणवणाऱ्या भागात लोशनचा वापर करा. यासाठी तुम्ही रिच हँड क्रीमचा वापर करू शकता. तसेच रात्रभर कॉटनचे हातमोजे आणि पायमोजे वापरा, विशेषतः हिवाळ्यात जाणवणारा कोरडेपणा दूर करण्यासाठी आणि त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी हे फायदेशीर ठरू शकते.५) केसांना कंडिशनिंग करा रात्री झोपण्यापूर्वी लिव्ह–इन कंडिशनरच्या मदतीने केसांचे कंडिशनिंग करा. झोपण्यापूर्वी तुम्ही असे केल्यास केसांना योग्य पोषण मिळते, शिवाय ते तुटण्यापासून रोखता येतात. तसेच केस मुलायम आणि घनदाट होतात. हिवाळ्याच्या दिवसांत अनेकदा केस खूप कोरडे आणि ठिसूळ होतात, ज्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी कंडिशनिंग ट्रीटमेंट हा एक चांगला पर्याय असू शकतो.६) कोमट पाण्याने अंघोळ करा हिवाळ्यात गरम पाण्याने अंघोळ करताना बरे वाटते, परंतु यामुळे तुमच्या त्वचा आणि केसांमधील नैसर्गिक तेलाचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे कोरडेपणा वाढतो. ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आणि होणारी जळजळ रोखण्यासाठी कोमट पाण्याने अंघोळ करा. यातून आपली त्वचा हायड्रेटेड राहील याची खात्री करा. ७) लिप बाम वापरा झोपण्याआधी ओठांना हायड्रेटिंग लिप बाम लावा. स्कीनकेअर रुटीनदरम्यान ओठांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते, यामुळे ओठ कोरडे होण्यासह भेगा पडल्याने त्यातून काही वेळा रक्त येऊ लागते. विशेषतः हिवाळ्यात लिप बामचा वापर करून तुम्ही ओठ मऊ आणि गुळगुळीत ठेऊ शकता.



## सर्व सामाजिक संघटनांनी मिशन अभ्यासिका या विषयावर सोबत यावे – शंकर कंकाळ

भीम क्रांती युवा संघटनेच्या वतीने त्याग मूर्ती रमाई यांची जयंती निमित्त सन्मान सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक स्वराज्य भवन येथे करण्यात आले होते यावेळी शंकर कंकाळ यांनी आपल्या मार्गदर्शक भाषणामध्ये म्हणाले की सर्वच महापुरुषांनी शिक्षणासाठीत्यांच्या शक्तीनुसार प्रयत्न केले आहेत त्यामुळे आज खऱ्या अर्थाने शिक्षणासारख्या अमूल्य कार्यामध्ये आपण सर्व सामाजिक संघटनांनी मिशन अभ्यासिका या विषयावर सोबत आले पाहिजे असे शंकर कंकाळ यांनी आव्हान केले आज गावासह शहरातील वस्त्यांमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने दोन मजली डिजिटल अभ्यासिका झाल्याच पाहिजे त्याचबरोबर संविधान सभागृह ही योजना सुद्धा अमलात आणून ताबडतोब सुरू झाली पाहिजे त्यासाठी सर्वांचाच पुढाकार अपेक्षित आहे या कार्यक्रमाला प्रकाशजी तायडे, पूजाताई काळे,



महेंद्र जी गवई, गुरुदेव जी पळसपगार,मनीष जी मोहळ, पुष्पाताई देशमुख, किरणजी ठाकरे आदि सह संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन भीम क्रांती युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष जयदीप जी पळसपगार यांनी केले होते या कार्यक्रमात मिशन अभ्यासिका या कार्यासाठी मला सन्मानित सुद्धा करण्यात आले.

## बाहेर जेवताय? मेन्यू असा निवडा!

– गौरी शिंगोटे आजकाल कोपऱ्याकोपऱ्यांवर मिळणाऱ्या विविध चमचमीत, चवदार खाद्यपदार्थांमुळे बऱ्याच व्यक्ती व कुटुंबांचे बाहेर खाणे किंवा बाहेरून ऑर्डर करून खाणे खूपच सवयीचे झाले आहे. यामध्ये बरीच विविधता व सोय दिसत असली, तरी चौरस आहार निवडण्यासाठी हे एक आव्हान आहे.परंतु, पोषक आहार व आरोग्यनियंत्रण बिंदूबाबत जागरूकता बाळगून विचारपूर्वक निवड केल्यास, बाहेरून मागवलेल्या किंवा हॉटेलमध्ये घेतलेल्या जेवणाचा आनंद आपल्या आरोग्याशी कोणत्याही प्रकारची तडजोड न करता घेता येतो.मेन्यूची निवड बाहेर जेवताना किंवा बाहेरून ऑर्डर करताना चौरस आहाराचा समावेश होईल, असा मेन्यू काळजीपूर्वक निवडणे ही पहिली पायरी आहे. निरनिराळ्या खाद्यवर्गांतील – उदाहरणार्थ, हलकी प्रथिने, पूर्ण धान्य, फळे व भाज्या असे पदार्थ शोधा. तळलेल्या व जास्त सॉस वापरलेल्या पदार्थांपेक्षा ग्रिल्ड, उकडलेले वा भाजलेले पदार्थ निवडावे. हल्ली बऱ्याच उपाहारगृहांमध्ये पदार्थांची पोषणविषयक माहिती दिलेली असते, ज्यामुळे योग्य पदार्थांची निवड करणे सोपे जाते.

## निखिल वागळे, विश्वंभर चौधरी, ॲड असिम सरोदे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे

महाराष्ट्र राज्यात सद्सद्विवेकबुद्धी शाबूत असलेल्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे..यापूर्वीच आपण विवेक बुद्धी असणारे दाभोळकर पानसरे कलबुर्गी यासारख्यांना गमाविले आहे.’ गाडी खाली आलेल्या कुत्र्या...’ भाषा करणारा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्याचे पोलिस हे फॅसिस्ट गुंडाना सामील असल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. महाराष्ट्र राज्यात रोज सुरु असलेल्या हिंसक घटना, दंगली पटविण्यासाठी रोजच सुरू असलेल्या अफवा आणि कारस्थाने, समाजाच्या विविध घटकांमध्ये वितुष्ट आणि द्वेष पसरवण्यासाठी केले जाणारे खेळ आपण पहात आहोत आणि महाराष्ट्र राज्यात सत्ताधारी यांच्या जनविरोधी धोरणांमुळे मेटाकुटीला आलेले शेतकरी, उध्वस्त होत असलेले कामगार आणि मजूर, गलितगात्र बनलेला मध्यमवर्गीय, यांच्या आशा आकांक्षा याचा चुराडा केला जात आहे.

महाराष्ट्र कधी नव्हे इतका उध्वस्त होत आहे यात लोकशाही आणि विचार स्वातंत्र्य टिकविणे याची सर्वात पहिली गरज आहे. खोकेबाज दरोडेखोरांची आणि देशद्रोही नथुरामाची ही अभद्र युती असलेल्या सत्ताधाऱ्यांना धुळ चारणे गरजेचे बनले आहे..!!

*********

– कॉम्रेड राजन क्षीरसागर
भारतीय कम्युनिस्ट पक्ष
मो ९८६०४८८८६०
निर्भयबनो

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्वरित बसवा ; अन्यथा आमरण उपोषण

किनवट .ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) :- छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बसवण्यात येणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा दि.१५ फेब्रुवारी पर्यंत निष्कासित केलेल्या मूळ ठिकाणी बसवा अन्यथा दि.१८/०२/२०२४ पासून आमरण उपोषणास बसत असल्याचे निवेदन अमरदीप गोपीनाथराव कदम, राजगड व संतोष माधवराव अडकिने, चिखली यांनी उपविभागीय अधिकारी किनवट यांना दिले आहे.

किनवट नगर परिषद प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा दि.०६/०६/२०२३ रोजी आणून भूमी पूजन करून ८. महिने होऊन गेले आहेत तरी पुतळा बसविण्यासाठी प्रशासनाच्या कोणत्याही हालचाली दिसुन येत नाहीत.

पुतळा बसविणे साठी वेळ लागत होता तर पुतळा आणून बंदिस्त करुण पुतळ्याची विटंबना करायची होती काय, अशा बेजबाबदार प्रशासकिय अधिकारी व पुतळा समिती वर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करुण त्वरीत दि.१५/०२/२०२४ पर्यंत नियमित केलेल्या मुळ ठिकाणीच पुतळा बसविण्यासाठीचे काम चालू करण्यात यावे अन्यथा अमरदीप एक्स गोपीनाथराव कदम, राजगड व संतोष माधवराव अडकिने, चिखली अमरण उपोषण दि.१८/०२/२०२४ पासूम उपविभागीय कार्यालय सामोर, नांदेड रोड किनवट येथे चालु करण्यात येईल असे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# मंडईत भाजीपाल्याची आवक ५० टक्के

लातूर : प्रतिनिधी शहरातील महात्मा फुले भाजी मंडईत गेल्या काही दिवसापासून भाजीपाल्याची आवक सातत्याने घटत आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर वाढत असले तरी या आठवड्यात मात्र ही वाढ दिसून आली नाही. या आठवड्यातही शहरातील बाजार समितीत भाजीपाल्याची आवक गेल्या आठवड्याच्या तुलनेत मोठया प्रमाणात घटली आहे. मात्र सर्वसामान्यांच्या गरजेच्या भाज्यांची आवक घटुनही किरकोळ बाजारात भाज्यांचे दर स्थिर राहील्याचे दिसत आहे.गेल्या काही दिवसापासून शहरातील मंडईत भाजीपाल्याची आवक सरासरीच्या तुलनेत कमी होत चालली आहे. सध्या महात्मा फुले भाजी मंडईत ७९१ क्विंटल भाजीपाल्याची आवक झाली आहे. दिवसेंदिवस ही घटत चाल्याचे दिसून येत आहे. शहरातील बाजार समितीत शनिवारी झालेल्या भाजीपाल्याची आवक प्रति दहा किलोत वागें २६ क्विंटलपर्यंत आवक होऊन सर्वसाधारण भाव ७० रुपये प्रति दहा किलो दर मिळाला. दोडका १३ क्विंटलपर्यंत आवक होऊन भाव ४५० रुपये, भेंडि १८ क्विंटलपर्यंत आवक होऊन ३०० रुपये भाव, पत्ताकोबी ३४ क्विंटलपर्यंत आवक होऊन १०० रुपये, फुलगोबी ५५ क्विंटलपर्यंत आवक होऊन १५० रुपये, गावरान टमाटे ११९ क्विंटलपर्यंत आवक होऊन १०० रुपये, वैशाली टोमॅटो १७२ क्विंटलपर्यंत आवक होऊन १२० रुपये,गवार शेंगा ७ क्विंटलपर्यंत आवक होऊन ५०० रुपये, पालक १ क्विंटलपर्यंत आवक होऊन ८० रुपये, गाजर ४० क्विंटलपर्यंत आवक होऊन १२० रुपये, भोपळा ३४ क्विंटलपर्यंत १०० रूपये, कोंथीबीर ३६ क्विंटलपर्यंत आवक होऊन २०० रुपये, हिरव्या मिरचीची ६३ क्विंटलपर्यंत आवक होऊन ४०० रुपये, वैशाली मिरची १७ क्विंटलपर्यंत आवक होऊन २४० रुपये, वरणा ३० क्विंटलपर्यंत आवक होऊन ३०० रुपये, वटाना १३ क्विंटलपर्यंत आवक होऊन ३०० रुपये, शेवगा २१ क्विंटलपर्यंत आवक होऊन ४०० रुपये, मेथी २९ क्विंटलपर्यंत आवक होऊन ३०० रुपये, कांदा पात ९ क्विंटलपर्यंत आवक होऊन ३०० रुपये, लिंबू १६ क्विंटलपर्यंत आवक होऊन ४२० रुपये, काकडी २२ क्विंटलपर्यंत आवक होऊन १२० रुपये, कारले १२ क्विंटलपर्यंत आवक होउन २४० रूपये, बिट ३ क्विंटलपर्यंत आवक होऊन १५० रुपयापर्यंत प्रति दहा किलाकला दर मिळाला आहे.

# पणजी होणार भारतातील पहिले एलपीजी मुक्त शहर

पणजी : गोवा हे पहिले रॉकेलमुक्त राज्य म्हणून घोषित झाल्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने १८ ते २४ महिन्यांत पणजीला भारतातील पहिले एलपीजी मुक्त शहर बनवण्याचा आराखडा तयार केला आहे. लवकरच एलपीजी ऐवजी स्वयंपाकघरात पाईपलाईनद्वारा नैसर्गिक गॅस पुरवला जाणार आहे. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी, जीएनएसपीएलला प्रकल्प जलदगतीने मार्गी लावण्यासाठी आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी राज्य सरकारच्या पाठिंब्याची आवश्यकता असेल.



मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी रॉकेलमुक्त झालेले गोवा हे देशातील पहिले राज्य आहे, अशी घोषणा राज्याचे बजेट मांडताना केली होती. त्यानंतर आता गोव्याची राजधानी असलेल्या पणजीला एलपीजी मुक्त बनवण्याचा निर्धार सरकारने केला आहे. त्यासाठी आराखडा तयार करण्यात आला असून येत्या दीड ते दोन वर्षात प्रत्येकाला पाईपलाईनच्या माध्यमातून स्वयंपाक घरात नैसर्गिक गॅस उपलब्ध होणार आहे.

# वाई बाजार फाट्यावर अपघात; वृद्ध जागीच ठार:

किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत ) किनवट राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वाई बाजार येथील फाट्यावर अज्ञात वाहनाने वृद्धास जबर धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला असून धडक देणारे वाहन रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाल्याने सिंदखेड पोलीस ठाण्याचे सपोनि सुशांत किंनगे यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने सदरील वृद्धाचे वाई बाजारच्या दवाखान्यात नेऊन शवविच्छेदन करत प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याची घटना दिनांक ५ रोजी रात्री ८ ते९ च्या दरम्यान घडली आहे. दि. ५ फेब्रुवारी रोजी रात्री आठ ते नऊ च्या सुमारास येथील फाट्यावर रस्ता ओलांडत असताना माहूर कडून सारखणीकडे जात असलेल्या एका चारचाकी अज्ञात वाहनाने त्यास जोराची धडक दिली. त्यात त्याचे दोन्ही पाय व दोन्ही हात तुटल्याचे पाहून स्थानिक अपघात नागरिकांनी तात्काळ सिंदखेड पोलीस ठाण्याचे सपोनी सुशांत किनगे यांना दूरध्वनी वरून घटनेची कल्पना दिली. घटनेची माहिती मिळताच सपोनी सुशांत किनगे यांनी दूरध्वनी वरून वाई बाजारच्या महिला




पोलीस पाटील सौ. आशा बळीराम मोरे यांना मयताच्या शवविच्छेदनासाठी प्रेतास वाई बाजारच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे नेण्याचे सांगून तात्काळ घटनास्थळी हजर होत त्याचा पंचनामा केला असता त्याच्या खिशात असलेल्या डायरीमध्ये त्यांच्या घरच्या नातेवाईकांचा दूरध्वनी नंबर आढळून आल्याने त्यांनी तात्काळ नातेवाईकांना दूरध्वनीवरून कल्पना दिली तसेच सदरील प्रकरणी गुन्हा नोंद करत अज्ञात वाहनाच्या शोध घेणे सुरुआहे.

# सहस्त्रकुंड परिसरात जमावबंदीचे आदेश, तहसिलदारांचा आदेश

किनवट .ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सहस्त्रकुंड परिसरातील सर्वे नंबर ५२ मधील जागे संदर्भात कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण झाल्याने या ठिकाणी जमावबंदीचे आदेश लागू करण्यात यावे. अशा स्वरूपाचे विनंती पत्र सा. पो. निरीक्षक इस्लापूर, सहस्त्रकुंड बाणगंगा मंदिर तीर्थक्षेत्र धर्मदाय





ट्रस्ट सचिव सतीश वाळकीकर यांनी उपविभागीय दंडाधिकारी किनवट यांचेकडे पुढील आदेश होण्यासाठी विनंती केलेली आहे. ज्यामध्ये इस्लापूर पोलीस स्टेशन हद्दीतील सहस्त्रकुंड परिसरातील सर्वे नंबर ५२ मध्ये मूर्तीचे नुकसान करून विटंबना केली. बाबत पोलीस स्टेशन इस्लापूर येथे दिनांक ५/२/ २०२४ रोजी गुन्हा रजिस्टर नंबर १४/२० २४ कलम २९५ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. त्यातच धर्मादाय ट्रस्टचे सचिव सतीश वाळकीकर यांनी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्याकडे निवेदन देऊन त्यामध्ये सहस्त्रकुंड पर्यटन स्थळ येथे येणाऱ्या अनेक अडचणी संदर्भात सदर ठिकाणी परस्पर स्थापित केलेल्या मूर्तीचा ताबा ट्रस्टला देण्यासंदर्भात आदेश व्हावे. या निवेदनाच्या अनुषंगाने भविष्यात सहस्त्रकुंड येथे जातीय दंगल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. त्या निवेदनाची दखल घेऊन अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्याची निर्देश दिले आहेत. या ठिकाणी मुर्त्याची विटंबना होऊन सामाजिक भावना दुखावल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची खात्री झाल्याने सदर पोलीस स्टेशन इस्लापूर हद्दीतील व वाळकी बु, तालुका किनवट परिसरातील हद्दीत व व पर्यटन स्थळाच्या हद्दीतील बाहेर एक किलोमीटर परिसरात शासकीय, निमशासकिय स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालय, विश्रामगृहे व इतर सार्वजनिक ठिकाणी परिसरात मिरवणुका काढणे घोषणा देणे, सभा घेणे, आणि पाच पेक्षा अधिक व्यक्ती जमा करणे यासाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. अशा स्वरूपाचे आदेश किनवट तालुका उपविभागीय दंडाधिकारी तथा तहसीलदार डॉक्टर मृणाल जाधव यांनी दिनांक ६/२/२०२४ ते २०/२/२०२४ फेब्रुवारी पर्यंत जमावबंदीचे आदेश लागू केले असल्याचे पत्राद्वारे कळवले आहे.

# पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीत अवैध जुगारावर छापेमारी, सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांची कारवाई

लातूर :- पोलीस ठाणे अहमदपूर हद्दीत अवैध जुगारावर छापेमारी, सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांची कारवाई. या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी.चंद्रकांत रेड्डी यांनी त्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर अहमदपूर शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी चालणाऱ्या मटका जूगारावर एकाच वेळी विविध पथके तयार करून कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक ०९/०२/२०२४ रोजी अहमदपूर येथे वेगवेगळ्या ठिकाणी पत्र्याच्या शेडमध्ये, तसेच रूम मध्ये काही इसम मटका कल्याण ,मिलन डे, टाईम बाजार नावाचा जुगार खेळत आहेत. अशी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर उपविभागीय पोलीस अधिकारी चाकूर यांनी अहमदपूर येथील मटन मार्केट परिसर, भीम नगर, गौरीशंकर बेंबळे यांचे राहते घरामध्ये अशा तीन ठिकाणी छापेमारी करून बेकायेशीररित्या मटका जुगार खेळत व खेळवीत असताना मिळून आल्याने इसमावर कार्यवाही करत त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा एकूण ५ लाख ८६ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस ठाणे अहमदपूर मध्ये खालील नमूद इसमाविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चा कलम १२(अ), ४, ५ कायद्यान्वये प्रमाणे ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

१) जगदीश रामलाल मंडले, वय ४९ वर्ष रावळी, अहमदपुर
२) रतन मदनलाल बरेटीय, वय ३० वर्ष रा काहळेगाव रोड, अहमदपुर
३) छोटुलाल हिरामण भगत, वय ४९ वर्ष रा. चौडा नगर अहमदपुर
४) इंद्रजीत हनुमान राऊते वय ४९ वर्ष रा. गवळी गाली अहमदपुर.
५) मिलकांत गोपाळ काबलीया वय ३४ वर्ष रा. महात्मा फुले रोड, अहमदपुर.
६) रमेश सिताराम भगत बय ३२ वर्ष रा. गवळी गली अहमदपुर.
७) मनिष कालीदारा मदनेवार वय ४४ वर्ष रा. ब्राम्हण गली अहमदपुर.
८) योगीराज आर्जुन मंडले वय ४४ वर्ष रा. गवळी गल्ली अहमदपुर.
९) सुरज राऊत्रे,रा. अहमदपुर (फरार)
१०) धरम काबली ,रा. अहमदपुर (फरार)
११) राजेश भगत, रा. अहमदपुर (फरार)
१२) गणेश बरेटीया, रा. अहमदपुर (फरार)
१३) शुभम राउले, रा. अहमदपुर (फरार)
१४) विशाल मंडले, रा. अहमदपुर (फरार)
१५) नितु राउले, रा. अहमदपुर (फरार)
१६) सोनु राउले , रा. अहमदपुर (फरार)
१७) देवा भगत , रा. अहमदपुर (फरार)
१८) श्याम गोपाल यादव/काबलीये, रा. अहमदपुर (फरार)
१९) खयुम पठाण, रा. अहमदपुर (फरार)
२०) रुपेश कांबळे , रा. अहमदपुर (फरार)
२१) विशाल डावरे , रा. अहमदपुर (फरार)
२२) शबदर लष्करे , रा. अहमदपुर (फरार)
२३) रियाज पटेल रा. अहमदपुर (फरार)
२४) व्यंकट बुजारे रा ढाळेगाव, अहमदपुर (फरार)
२५) जगूफड रा. धर्मापुरी (फरार)
२६) गौरीशंकर मारोतीराव बेंबळे, वय ५२ वर्ष रा. बालाजी मंदीराचे पाठीमागे अहमदपुर.
२७) चांदपाशा महेबुबसाब शेख, वय ४८ वर्षे रा. महसूल कॉलनी अहमदपूर.
२८) दत्तालय सिताराम वाघमारे, वय ३८ वर्षे, आण्णाभाऊ साठे नगर अहमदपूर.
२९) जयसिंग पांडूरण शेळके, वय ६५ वर्षे रा. इंदिरानगर अहमदपूर.
३०) किवान भिकाजी जंगले ,वय ६० वर्षे रा. पंचशिल नगर अहमदपूर.
३१) राम गंगाराम जाधव ,६० वर्ष रा तिपक्षा नगर, अहमदपूर.
३२) विजय सुर्यकांत पवार, वय ४२ वर्षे, रा. तिपन्ना नगर आमदपूर.
३३) हिरालाल धर्मराज काबाली, वय ३३ वर्षे, राहणार वेताळगली अहमदपूर.
३४) अंकुश काशीनाथ आया दांडगे, यय ४३ वर्ष रा. अहमदपुर.
३५) शेख खदीर गनीसाब, वय ३८ वर्ष, रा. अहमदपुर.
३६) दिलीप राम गायकवाड ,वय ४४ वर्ष ना. साठेनगर अहमदपुर .
३७) शेख करीम गफुरसाब वय ५५ वर्ष रा हाळणी ता. अहमदपुर.
३८) गणेश तुळजाराम बटावाले. वय ४१ वर्ष रा. महादेव सम्बी अहमदपुर.
३९) मधुकर माधवराव शिंदे, वय ४५ वर्ष रा. काजळहिप्परगा ता. अहमदपुर.
४०) जुबेर अहमदखी पठाण,वय ३३ वर्ष रा. माँदा रोड अहमदपुर.



४१) गौतम गोरोबा, वय ३९ गायकवाड भीम नगर, अहमदपुर.
४२) धनाजी सुदाम बेले, वय ४१ वर्ष ना. रोकडा सावरगाव.
४३) सुरेश तालेराव वाघमारे, वय ३० वर्ष, रा. अहमदपुर.
४४) बालाजी बळीराम सन्मुखराव , वय ४० वर्ष दोघे रा. अहमदपुर.
४५) जनार्धन नागनाथ कौटंबे वय ३५ वर्षे रा. रोकड़ा सायरगाव, अहमदपुर.
४६) गजानन शिवकांत कावळे वय ३५ वर्ष रा. रोकडा सावरगाव.अहमदपुर.
४७) संजय गंगाराम शेधर, वय ३० वर्ष रा. महात्मा फुले सोसायटी कंधार.
४८) बालाजी प्रकाश मुळे वय २५ वर्ष रा.माकणी
४९) बालाजी निवृत्त शिंदे, वय ३८ वर्ष रा. साठे मगर, अहमदपुर.
५०) वैजनाथ श्रीराम केंद्रे वय ३४ वर्ष रा. लांझी.
५१) भिमराव विठ्ठलराव आचार्य वय ६७ वर्ष रा. परचंडा.
५२) शुभाष मानिक बाबर, वय २८ वर्ष रा. हाळदव ता. लोहा
५३) लक्ष्मण जळबा पेडनपाड वय २७ वर्ष रा. चारटागी, अहमदपुर
५४) निजाम इसाक शेख वय ५० वर्ष रा. देशमुखवाड, अहमदपुर.
५५) राजु बालाजी पाटील यय ५२ वर्ष रा. पाटील गल्ली, अहमदपुर

असे असून वरील आरोपी मटका नावाचा जुगार खेळत असताना मिळून आलेले आहेत.तसेच पोलिसांची चाहूल लागतात पळून गेलेल्या फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांच्या आदेशावरून जिल्ह्यात अवैध व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर धाडी मारुन कार्यवाही करण्याचे सत्र सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक ०९/०२/२०२४ रोजी पोलीस ठाणे अहमदपूर येथे पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलिस अधिकारी चाकूर तथा सहाय्यक पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी सदरची कामगिरी केली आहे. पुढील तपास अहमदपूर पोलिस करीत आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE